MMRC

# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

मुं.मे.रे.कॉ. ला टी.ए.आय. टनेलिंग अँड अंडरग्राउंड स्पेस अवॉर्ड्स २०२२ द्वारे "एन्व्हायरॉनमेंट इनिशिएटिव्ह ऑफ द ईयर" पुरस्कार मिळाला

मुंबई, २८ जून, २०२२ - टी.ए.आय. टनेलिंग अँड अंडरग्राउंड स्पेस अवॉर्ड्स २०२२ समारंभात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ.) ला “एन्व्हायरॉनमेंट इनिशिएटिव्ह ऑफ द ईयर" पुरस्कार प्राप्त झाला. पुरस्कार डॉ. मंगू सिंग, अध्यक्ष ट. ए. आय, श्री. सुरेश शर्मा, वरिष्ठ उपाध्यक्ष, श्री. आर. के. खली, ट. ए. आय., श्री. ए. के. दिनकर, सचिव ट. ए. आय, द्वारे प्रदान करण्यात आला आणि श्री.एस.के. गुप्ता, संचालक (प्रणाली), श्री. सी.एम जाधव, कार्यकारी संचालक (स्थापत्य) यांनी मुं.मे.रे.कॉ. च्या वतीने पुरस्काराचा स्वीकार केला.

"हाती घेतलेल्या पुढाकारांचं जेव्हा कौतुक केलं जातं तेव्हा ते नेहमीच स्फूर्तिदायक असतं. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग हा एम.आर.टी.एस. प्रकल्प आहे. वाहनांमधून जाणारे प्रवासी मेट्रोकडे वळल्यामुळे हरितगृह वायू उत्सर्जन कमी होईल. मेट्रो प्रकल्पांमुळे रस्त्यांवरील वाहतूक कोंडी आणखी कमी करणं आणि अशा प्रकारे रस्त्यावरील वाहनांद्वारे उत्सर्जित होणाऱ्या वायू प्रदूषक वायूंमुळे होणारं वायू प्रदूषण कमी करणं, शहराचं पर्यावरण सुधार, प्रदूषण कमी करणे, कनेक्टिव्हिटी आणि दळणवळण सुधारणं हे या प्रकल्पाचं उद्दिष्ट आहे, असे महानगर आयुक्त, एम.एम.आर.डी.ए आणि व्यवस्थापकीय संचालक, मुं.मे.रे.कॉ. श्री.एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी सांगितलं.

आय.टी.ए. टनेलिंग आणि अंडरग्राउंड स्पेस अवॉर्ड्सची ही ८वी आवृत्ती आहे. टनेलिंग एशिया’ २०२२ ही आंतरराष्ट्रीय टनेलिंग आणि अंडरग्राउंड स्पेस असोसिएशन (ITA) च्या नेतृत्वाखाली टनेलिंग असोसिएशन ऑफ इंडिया (TAI) आणि CBIP द्वारे आयोजित द्विवार्षिक आंतरराष्ट्रीय परिषद आहे. २०१५ पासून, ITA टनेलिंग अँड अंडरग्राउंड स्पेस अवॉर्ड्स हे भुयार आणि भूमिगत बांधकामातील सर्वात अद्वितीय नवकल्पना आणि उत्कृष्ट प्रकल्पांना पुरस्कार देत आहेत.

यावेळी संचालक (प्रकल्प), श्री.एस.के. गुप्ता, श्री. सी.एम जाधव, कार्यकारी संचालक (स्थापत्य), श्री. सुयश त्रिवेदी, महाव्यवस्थापक (स्थापत्य), श्री. अजय फुलमाळी, वरिष्ठ उप महाव्यवस्थापक (पर्यावरण) मुं.मे.रे.कॉ. आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. (समाप्त)

For further information please contact: -
Afreen Shaikh
8655533926
afreen.shaikh@mmrcl.com

Niti Tamse/AM (PR)
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com